# प्रेस नोट

## नगरसेवकास खंडणी मागितल्याप्रमणी कुविख्यात गुंड निलेश घायवळ यास अटक

कुविख्यात गुंड निलेश बन्सीलाल घायवळ, रा. शास्त्रीनगर, कोथरूड, पुणे व त्याचा साथीदार नामे सागर सोनबा जोगावडे, रा. कोथरूड, पुणे यांना पुणे कॉन्टोंमेंट बोर्डाचे नगरसेवकास खंडणी मागितल्या प्रकरणी खंडणी विरोधी पथकाकडून दि. १५/११/२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर बाबत लष्कर पोलीस ठाणे येथे खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कॉन्टोंमेंट बोर्डाचे नगरसेवकाने एप्रिल २०१७ मध्ये कोरगांवपार्क येथील व्यवसायीक मित्रास ५ लाख रूपये घरगुती कारणास्तव दिले होते. सदर रक्कम परत मागू नये म्हणून निलेश घायवळ व त्याच्या साथीदारांनी नगरसेवकास जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. तसेच घायवळ याने सदर नगरसेवकास दर महिन्यास एक लाख रूपये खंडणी देण्याची धमकी दिली होती.

गुंड निलेश घायवळ यास पुर्वी खून, खूनाचा प्रयत्न, मारामारी अशा विविधि प्रकारच्या ०९ गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली होती. तो फेब्रुवारी २०१७ मध्ये सचिन कुडलेच्या खुनाचे केस मधून जामीनावर बाहेर आला होता. सदर गुन्ह्यात मोका कायद्यांन्वये कारवाई करण्यात आली होती. सदर गुन्ह्यात घायवळ हा ६ वर्षा पेक्षा अधिक काळ तुरूंगात होता.

वरील कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्रीमती रश्मि शुक्ला मॅडम, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. रविंद्र कदम, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रदीप देशपांडे, पोलीस उप आयुक्त श्री. पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे -१, श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, सपोनि. श्री. सुनिल गवळी, सपोनि श्री. विठ्ठल शेलार, पोलीस कर्मचारी नामे अविनाश मराठे, सुधीर इंगळे, प्रमोद मगर, मंगेश पवार, हनुमंत गायकवाड, धीरज भोर, रमेश गरुड, शिवाजी घुले, संतोष मते, भाऊसाहेब कोंढरे, सचिन अहिवळे, रणजित अभंगे, नारायण बनकर यांनी केली आहे.